# बांधकाम क्षेत्रात ॲल्युमिनियमचे अधिक महत्त्व

## वालचंद इन्स्टिट्यूटमधील चर्चेचा सूर

**शहर संचार**

सोलापूर, दि. १९- बांधकामाची मजबुती त्यामध्ये वापरात आणलेल्या धातूंच्या गंजण्यावर अवलंबून असते. वजनाने अधिक असलेल्या स्टीलचा उपयोग अधिक होतो, तरीही वजनाने हलके असलेल्या ॲल्युमिनियमचे महत्त्व कमी होत नसून उलटपक्षी ते अधिक उपयोगात आणले जात आहे, असा सूर वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये आयोजित चर्चासत्रात सहभागी तज्ज्ञांनी व्यक्त केला.

श्री ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाला संचलित वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय आणि इंडियन सोसायटी फॉर स्ट्रक्चरल इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम उद्योगातील ॲल्युमिनियम उत्पादनांचा वापर या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. यामध्ये अभियंत्ये राजू परुळेकर, मनोज रणदिवे, सुनीलकुमार पाटील यांनी सहभाग नोंदविला होता.



वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये आयोजित बांधकाम उद्योगातील ॲल्युमिनियम उत्पादनांचा वापर या विषयावर चर्चासत्राचे उद्‌घाटन दीपप्रज्वलनाने करताना अभियंता राजू परुळेकर, इंजिनिअर जगदीश दिड्डी, अभियंता मनोज रणदिवे, अभियंता सुनीलकुमार पाटील, इंजिनिअर ओम दरक.

सोलापुरातील शंभराहून अधिक स्थापत्य अभियंत्यांनी या चर्चासत्राचा लाभ घेतला. ॲल्युमिनियम उत्पादनाच्या स्ट्रक्चरल डिझाइन व उपयुक्ततेचा आढावा घेताना आयएसएसईचे अध्यक्ष अभियंता सुनीलकुमार पाटील म्हणाले, बांधकाम व्यवसायात स्टीलनंतर ॲल्युमिनियम सर्वाधिक प्रमाणात वापरला जातो. स्टीलच्या तुलनेत ॲल्युमिनियम ६६ टक्के वजनाने हलके असून गंजरोधक असल्याने बांधकाम क्षेत्रात त्याचा उपयोग अनेक स्तरावर केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

ॲल्युमिनियम छप्पर आणि तावदानातील वापरावर प्रकाश टाकताना आदित्य बिर्ला हिंडाल्को कंपनीच्या ॲल्युमिनियम विभागाचे प्रमुख अभियंता राजीव परुळेकर सोप्या शैलीत मनोरंजकतेने स्लाईड शोद्वारे संवाद साधला. ॲल्युमिनियमच्या एव्हरलास्ट या पत्र्यांचे गुणधर्म व त्याच्या उपयोगाबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आसाम, केरळ इत्यादी दमट हवामानाच्या प्रदेशातदेखील एव्हरलास्ट पत्रे पन्नासहून अधिक वर्ष टिकून राहतात, हे परुळेकरांनी अनेक उदाहरणाने पटवून दिले. प्रमुख पाहुणे इंजिनिअर मनोज रणदिवे यांनी ॲल्युमिनियम एक्ट्रजनबाबत माहिती दिली. ॲल्युमिनियम व्यवसायात एक्ट्रजनचे महत्त्व त्यांनी विषद केले.

प्रारंभी आयएसएसईचे अध्यक्ष पाटील आणि सचिव ओम दरक यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन इंजिनिअर शशिकांत गोसावी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आयएसएसईचे सहसचिव इंजिनिअर जगदीश दिड्डी व खजिनदार इंजिनिअर वैभव होमकर यांनी प्रयत्न केले. आभार इंजिनिअर दरक यांनी मानले.